दैनिक **MAHILA SANVAD**

# महिला संवाद

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर ▌ कार्यकारी संपादक : विद्या जाधव ▌ उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

PUNE : Volume No. 1, Issue No. 298, Marathi Daily Monday, Date - 08 June 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २९८ वा | मराठी दैनिक | सोमवार दि. ०८ जून २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धामिर्क, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

**महिला संवाद**

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या नव्या अटींविरोधात विद्यार्थ्यांचा संताप; शासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह

## स्वाधार योजनेत ३० वर्ष वयाची अटीमुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहण्याची नामुष्की

**जालना । विकास साळवे**

राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल,मागासवर्गीय आणि उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जीवनरेषा ठरलेली डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना आता नव्या वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे.योजनेच्या लाभासाठी ३० वर्षांची वयोमर्यादा निश्चित करण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून,शासनाच्या धोरणावर प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली आहे.

शिक्षणाला वयाची अट नसते,मग स्वाधार योजनेला का ? असा थेट सवाल विद्यार्थी विचारत आहेत.आर्थिक अडचणी,कौटुंबिक जबाबदाऱ्या,रोजगाराचा संघर्ष आणि प्रतिकूल परिस्थितीमुळे अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण उशिरा सुरू होते किंवा मध्येच खंडित होते. अनेक जण नोकरी करत-करत पदव्युत्तर,व्यावसायिक किंवा स्पर्धा परीक्षांसाठी शिक्षण घेत असतात.मात्र आता स्वाधार योजनेसाठी ३० वर्ष वयाची अट घातल्याने विद्यार्थ्यांना स्वाधारच्या मदतीपासून वंचित राहावे लागणार आहे.

गरिबीमुळे शिक्षणात विलंब झाला, परिस्थितीमुळे शिक्षण अर्धवट राहिले किंवा उशिरा शिक्षणाची संधी मिळाली,तर त्या विद्यार्थ्याचा काय दोष ? शासनाने शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाच शिक्षा देण्याचा निर्णय घेतला आहे का ? असा संतप्त सवाल विद्यार्थी संघटनांकडून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान,स्वाधार योजनेसाठी उपलब्ध निधी कमी केला जात असल्याची आणि तो इतर योजनांकडे वळवला जात असल्याची चर्चा सुरू आहे. याबाबत शासनाने तात्काळ ही अट शिथील करून शिक्षण घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांना,स्वाधार लागू करावा अशी मागणी होत आहे.सामाजिक न्यायाच्या नावाखाली सुरू झालेल्या योजनेचा निधी जर अन्यत्र वळवला जात असेल,तर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करण्याचा हा प्रकार नाही का ? असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी शस्त्र मानले होते. मग त्यांच्या नावाने सुरू असलेल्या योजनेतच वयोमर्यादेची भिंत उभी करून शिक्षणाची दारे बंद करण्याचा प्रयत्न का केला जात आहे ? हा निर्णय बाबासाहेबांच्या विचारांशी सुसंगत आहे का ? याचे उत्तर शासनाने द्यावे,अशीही मागणी विद्यार्थी करत आहेत.

आजही हजारो मागासवर्गीय विद्यार्थी आर्थिक विवंचना,कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि रोजगाराच्या संघर्षातून शिक्षण पूर्ण करण्यासाठी झगडत आहेत.अशा विद्यार्थ्यांसाठी स्वाधार योजना ही केवळ आर्थिक मदत नसून त्यांच्या स्वप्नांना आधार देणारी जीवनवाहिनी आहे.मात्र ३० वर्ष वयाची अट लावून शासनाने ही जीवनवाहिनीच तोडण्याचा प्रयत्न केल्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली आहे.

शिक्षण घेण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे,मग स्वाधार योजनेचा अधिकार वयाच्या चौकटीत का अडकवला जात आहे ?

३० वर्ष वयानंतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊ नये,असा संदेश शासन देत आहे का?

सामाजिक न्यायाचा दावा करणारे सरकार या प्रश्नांची उत्तरे देणार का?

या निर्णयाविरोधात राज्यभरातील विद्यार्थी संघटना आणि सामाजिक कार्यकर्ते आक्रमक होत असून,स्वाधार योजनेतील ३० वर्षांची वयोमर्यादा तात्काळ रद्द करून शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक पात्र विद्यार्थ्याला योजनेचा लाभ देण्यात यावा,अशी जोरदार मागणी पुढे येत आहे.अन्यथा येत्या काळात विद्यार्थ्यांचा असंतोष रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही यानिमित्ताने दिला जात आहे.

# अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरण उघड

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील तळेगाव दाभाडे परिसरातून एक अत्यंत संतापजनक आणि धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका १२ वर्षीय अल्पवयीन मुलीवर तिच्याच मित्राने लैंगिक अत्याचार केल्याची आणि त्यानंतर तिचे आक्षेपार्ह (न्यूड) फोटो सोशल मीडियावर व्हायरल केल्याची घटना उघडकीस आली आहे. या गंभीर प्रकरणी तळेगाव दाभाडे पोलिसांनी तात्काळ कारवाई करत दोन विधीसंघर्षित बालकांसह (अल्पवयीन मुले) एका कॅफे मालकाला अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून महिला व मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, पीडित १२ वर्षीय मुलगी तिच्या आईसोबत तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी आली होती. तिच्या काही मित्रांनी तिचे आक्षेपार्ह फोटो सोशल मीडियावर व्हायरल केल्याची प्राथमिक तक्रार तिने नोंदवली होती. या तक्रारीवरून पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल केला. पोलिसांनी जेव्हा पीडित मुलीकडे सखोल चौकशी केली, तेव्हा या प्रकरणातील धक्कादायक वास्तव समोर आले. काही दिवसांपूर्वी तिच्याच एका ओळखीच्या मुलाने तिला तळेगावमधील 'कोजी कॅफे' येथे नेले होते. या कॅफेमध्ये त्या मुलाने तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. धक्कादायक बाब म्हणजे, या कॅफेमध्ये अशा प्रकारचे अनैतिक आणि बेकायदेशीर कृत्य सुरू असल्याची माहिती पोलीस तपासात निष्पन्न झाली आहे. कॅफे मालक अशा प्रकारांना मुभा देत असल्याचे तपासात समोर आले आहे. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तळेगाव दाभाडे पोलिसांनी तातडीने पावले उचलली. 'कोजी कॅफे'चा मालक (शिंदे) याला पोलिसांनी या गुन्ह्यात अटक केली आहे. तसेच पीडित मुलीवर अत्याचार करणाऱ्या आणि तिचे फोटो व्हायरल करणाऱ्या दोन्ही अल्पवयीन मुलांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# व्हेनेझुएलाच्या कार्यवाहक राष्ट्राध्यक्षा डेल्सी रोड्रिग्ज व त्यांच्या शिष्टमंडळाचे आगमन व प्रयाण

**मुंबई । प्रतिनिधी**

व्हेनेझुएलाच्या कार्यवाहक राष्ट्राध्यक्षा डेल्सी रोड्रिग्सज व त्यांचे शिष्टमंडळाचे छत्रपती संभाजीनगर येथून छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई येथे आज सायं ४.०० वाजता आगमन झाले.

यावेळी मुंबईचे अतिरिक्त पोलीस आयुक्त अभिनव देशमुख, सामान्य प्रशासन (राजशिष्टाचार) विभागाच्या उपसचिव क्रांती पाटील, व्हेनेझुएलाचे प्रतिनिधी उपस्थित होते.



छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई येथून व्हेनेझुएलाच्या कार्यवाहक राष्ट्राध्यक्षा डेल्सी रोड्रिग्सज व त्यांच्या शिष्टमंडळाचे आज सायं ५.४० वाजता प्रयाण केले.

यावेळी मुंबईचे अतिरिक्त पोलीस आयुक्त अभिनव देशमुख, सामान्य प्रशासन (राजशिष्टाचार ) विभागाच्या उप सचिव क्रांती पाटील, व्हेनेझुएलाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# एसटी महामंडळाने प्रवाशांच्या समस्या सोडविण्यावर भर द्यावा- उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती आगारात नव्याने दाखल दहा 'राजमाता जिजाऊ' या अत्याधुनिक स्मार्ट बससेवेचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती तालुक्यातील पायाभूत सुविधा विकासाला नेहमीच प्राधान्य दिले.

त्यापैकीच एक आणि देशात मॉडेल बनलेल्या बारामती बसस्थानकाचा परिसर, बसमधील स्वच्छता राखणे, बस वेळेवर सोडण्यासह प्रवाशांची सुरक्षितता आणि त्यांच्या समस्या सोडविण्यावर राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) भर द्यावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी दिले.

'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान २०२५' मध्ये अव्वल स्थान पटकावल्याबद्दल बारामती बसस्थानक येथे आयोजित एसटी महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अभिनंदन कार्यक्रमात त्या बोलत होत्या.




यावेळी नगराध्यक्ष सचिन सातव, उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे, बारामती 'एमआयडीसी'चे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, एसटी महामंडळाचे पुणे विभाग नियंत्रक अरुण सिया, गट विकास अधिकारी किशोर माने, न.प. मुख्याधिकारी पंकज भुसे, विभागीय कामगार अधिकारी सचिन भुजबळ, आगार व्यवस्थापक प्रविण शिंदे, माजी सहाय्यक वाहतूक अधिक्षक घनश्याम सदाशिव शिंदे यांच्यासह महामंडळाचे कर्मचारी, संघटनेचे पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

# ५ वर्षांच्या चिमुकल्याचा गळा दाबून खून

**सोलापूर । प्रतिनिधी**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बरूर गावातून नात्याला काळिमा फासणारी एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. येथे एका नराधम काकानेच आपल्या अवघ्या ५ वर्षांच्या सख्ख्या पुतण्याला संपवल्याचे उघड झाले आहे. समर्थ यल्लाप्पा कास्तार असे मृत चिमुरड्याचे नाव आहे. या प्रकरणी संशयित आरोपी काका अंकुश परसप्पा कास्तार याच्या विरोधात मंद्रूप पोलीस ठाण्यात (चरपर्वीीि झेिश्रळलश डींरींळेप) गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे.




याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मृत समर्थचे आई-वडील दोघेही ऊसतोड कामगार आहेत. पोटाची खळगी भरण्यासाठी ते सतत बाहेरगावी असतात. त्यामुळे समर्थ हा दक्षिण सोलापूर तालुक्यातील बरूर येथील आपल्या आजीजवळ राहत होता. ४ जून रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास समर्थ हा मी खेळायला जातो, असे सांगून घरातून बाहेर पडला होता.

समर्थ घरातून बाहेर पडल्यानंतर काही वेळाने त्याचा काका अंकुश कास्तार याने समर्थला बेशुद्धावस्थेत घरी आणले. समर्थ खेळताना पत्र्यावरून खाली पडला आणि त्यामुळे तो बेशुद्ध झाला आहे, असा बनाव अंकुशने कुटुंबीयांसमोर केला. समर्थच्या नातेवाईकांनी कोणतीही शंका न घेता त्याला तात्काळ उपचारासाठी एका खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी अंती समर्थचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे घोषित केले. समर्थचा मृतदेह पाहिल्यानंतर त्याच्या डोळ्याला, गळ्यावर आणि हनुवटीवर काही संशयास्पद दुखापतीच्या खुणा दिसून आल्या. त्यामुळे पोलिसांच्या उपस्थितीत मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. या शवविच्छेदन अहवालात समर्थचा मृत्यू पत्र्यावरून पडल्याने नाही, तर त्याला गळा दाबून संपवण्यात करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली.

शवविच्छेदन अहवाल समोर येताच मंद्रूप पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंद केला. तसेच कुटुंबाची दिशाभूल करणाऱ्या आणि संशयित आरोपी असलेल्या काका अंकुश कास्तार याला पोलिसांनी तात्काळ अटक केली आहे. काका अंकुश याने अवघ्या ५ वर्षांच्या निष्पाप पुतण्याचा जीव का घेतला? या क्रूर कृत्यामागील नेमके कारण काय होते? याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. मंद्रूप पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# जैववैद्यकीय कचरा उघड्यावर टाकल्याप्रकरणी महापालिकेची दंडात्मक कारवाई; क क्षेत्रीय कार्यालयाची धडक मोहीम

**पिंपरी । प्रतिनिधी**

उघड्यावर जैववैद्यकीय कचरा टाकून पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण केल्याप्रकरणी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या 'क' क्षेत्रीय कार्यालयाने संबंधितांवर कठोर कारवाई करत ३५ हजार रुपयांचा दंड वसूल केला. क क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक २ मधील सेक्टर १३, चिखली येथे उघड्यावर जैववैद्यकीय कचरा टाकण्यात आल्याचे निदर्शनास आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

जैववैद्यकीय कचऱ्याची अयोग्य विल्हेवाट पर्यावरण प्रदूषणास कारणीभूत ठरत असून नागरिकांच्या आरोग्यालाही गंभीर धोका निर्माण करू शकते. या पार्श्वभूमीवर महापालिकेने तातडीने कारवाई करत संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांच्या निर्देशानुसार आणि उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल,सहायक आयुक्त किरणकुमार मोरे तसेच क क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही धडक मोहीम राबविण्यात आली.

जैववैद्यकीय कचऱ्याची नियमबाह्य विल्हेवाट ही पर्यावरणासह सार्वजनिक आरोग्यासाठी अत्यंत घातक आहे.जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध दंडात्मक कारवाई आणखी तीव्र करण्यात येईल, असे उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी यावेळी सांगितले.

तर क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे म्हणाले की, स्वच्छता आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने जैववैद्यकीय कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे. नियमभंग करणाऱ्यांवर यापुढेही सातत्याने आणि कठोर कारवाई करण्यात येईल. क क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आरोग्य अधिकारी योगेश फल्ले आणि मुख्य आरोग्य निरीक्षक वैभव घोळवे यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य निरीक्षक राहुल राखपसरे, आरोग्य सहाय्यक अमोल घुसर तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांच्या पथकाने ही कारवाई केली.

जैववैद्यकीय कचऱ्याची नियमबाह्य विल्हेवाट लावणाऱ्यांविरुद्ध यापुढेही अशाच प्रकारे कठोर कारवाई सुरू राहणार असून पर्यावरण संरक्षण आणि सार्वजनिक आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी नागरिकांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

## थोडक्यात...

### राज्यात मानसिक आरोग्य सेवांचे जाळे अधिक मजबूत करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामीण आणि आदिवासी भागांपर्यंत मानसिक आरोग्य सेवा प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांमध्ये 'उडान' प्रकल्पांतर्गत मानसिक आरोग्य सेवा अधिक बळकट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने सार्वजनिक आरोग्य विभाग आणि दोन स्वयंसेवी संस्थांमध्ये पाच वर्षांसाठी सामंजस्य करार करण्यास मंजुरी दिली आहे.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार, ग्रामीण आदिवासी समाज विकास संस्था, सौसर (मध्य प्रदेश) आणि अन्यथा फाउंडेशन या संस्थांच्या सहकार्याने जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. हा करार १ ऑगस्ट २०२६ ते ३१ जुलै २०३१ या कालावधीसाठी लागू राहणार असून, तो पूर्णपणे गैरवित्तीय स्वरूपाचा असल्याने राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही.

राज्यात मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत्या प्रमाणात समोर येत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. राष्ट्रीय मानसिक आरोग्य आणि मेंदू विज्ञान संस्थेच्या सर्वेक्षणानुसार देशातील सुमारे १० ते १४ टक्के प्रौढ व्यक्तींना मानसिक आरोग्याचे विकार आहेत. महाराष्ट्राची लोकसंख्या लक्षात घेता सुमारे १.२ ते १.८ कोटी नागरिक मानसिक समस्यांशी झुंज देत असल्याचे या सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात आरोग्य सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देत मानसिक आरोग्याला प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारले आहे. ग्रामीण भागात मानसिक आरोग्य सेवा अधिक परिणामकारकपणे उपलब्ध व्हाव्यात यासाठी 'उडान' प्रकल्पाचा विस्तार करण्यात येत आहे.

या प्रकल्पांतर्गत गावपातळीवर मानसिक आरोग्य जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असून ग्रामपंचायत, बचत गट, युवक गट यांचा सहभाग वाढविला जाणार आहे; तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, मनुष्यबळ प्रशिक्षण, मातृ मानसिक आरोग्य कार्यक्रम राबविणे, तसेच सौम्य आणि मध्यम स्वरूपाच्या रुग्णांना मानसोपचार व समुपदेशन सेवा देण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

याआधी नागपूर जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या 'उडान' प्रकल्पाला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर आता वर्धा जिल्ह्यातही हा कार्यक्रम विस्तारित करण्यात येत आहे. यामुळे ग्रामीण आणि आदिवासी भागातील नागरिकांना मानसिक आरोग्य उपचार आणि समुपदेशन सेवा स्थानिक स्तरावर उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने या करारासाठी आरोग्य सेवा संचालकांना अधिकृत केले असून, मानसिक आरोग्य क्षेत्रात शासन आणि स्वयंसेवी संस्थांमधील समन्वयातून राज्यातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न आहे.

# संपादकीय...

## शिक्षणाच्या हक्कावर अन्याय?

राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, मागासवर्गीय आणि उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आधारस्तंभ ठरलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सध्या नव्या वादाच्या केंद्रस्थानी आली आहे. या योजनेच्या लाभासाठी ३० वर्षांची कमाल वयोमर्यादा निश्चित करण्यात आल्याने राज्यभरातील विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. सामाजिक न्याय आणि शैक्षणिक समानतेच्या तत्त्वांवर उभारलेल्या योजनेत अशी वयोमर्यादा लादण्यामागील शासनाची भूमिका काय आहे, हा प्रश्न आता गंभीरपणे उपस्थित होत आहे. शिक्षण ही कोणत्याही व्यक्तीची मूलभूत गरज आणि घटनात्मक अधिकार आहे. शिक्षणासाठी वयाची मर्यादा नसते, ही बाब शासनालाही मान्य आहे. मग स्वाधार योजनेसारख्या शैक्षणिक सहाय्य योजनेत वयाचा निकष का लावला गेला? हा प्रश्न केवळ विद्यार्थ्यांचा नाही, तर सामाजिक न्यायाच्या संकल्पनेवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक नागरिकाचा आहे. राज्यातील हजारो विद्यार्थी गरिबी, कौटुंबिक जबाबदाऱ्या, आर्थिक संकटे आणि रोजगाराच्या संघर्षामुळे वेळेत शिक्षण पूर्ण करू शकत नाहीत. अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण मध्येच सोडावे लागते आणि काही वर्षांनंतर पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात यावे लागते. काही जण नोकरी सांभाळत पदव्युत्तर शिक्षण, व्यावसायिक अभ्यासक्रम किंवा स्पर्धा परीक्षांची तयारी करतात. अशा परिस्थितीत ३० वर्षांची वयोमर्यादा ही त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर अन्यायकारक मर्यादा ठरत आहे. वास्तविक पाहता, शिक्षण उशिरा सुरू होणे किंवा पूर्ण होण्यास विलंब होणे हा विद्यार्थ्यांचा दोष नसतो. सामाजिक आणि आर्थिक विषमता ही त्यामागील प्रमुख कारणे असतात. अशा विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठीच स्वाधार योजनेची निर्मिती करण्यात आली होती. मात्र आता त्याच योजनेत वयाचा अडसर निर्माण करून अनेक पात्र विद्यार्थ्यांना लाभापासून वंचित ठेवले जात असल्याची भावना निर्माण झाली आहे. या निर्णयामागे निधीअभावी लाभार्थ्यांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चाही समाजात सुरू आहे. जर खरोखरच स्वाधार योजनेचा निधी कमी करून तो इतर योजनांकडे वळविला जात असेल, तर हा प्रकार अधिक चिंताजनक आहे. कारण सामाजिक न्याय विभागाच्या योजनांचा मूळ उद्देश वंचित घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा आहे. त्यासाठीचा निधीच कमी केला गेला, तर सामाजिक न्यायाच्या संकल्पनेलाच धक्का बसणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन मानले होते. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा त्यांचा संदेश आजही समाजाला दिशा देतो. त्यांच्या नावाने सुरू असलेल्या योजनेतच वयोमर्यादेची भिंत उभारली जात असेल, तर हा निर्णय बाबासाहेबांच्या विचारांशी कितपत सुसंगत आहे, याचे उत्तर शासनाने देणे आवश्यक आहे. शासनाचे म्हणणे असे असू शकते की योजनांचा लाभ योग्य वयातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा आणि निधीचा कार्यक्षम वापर व्हावा. मात्र अशा धोरणांमुळे प्रत्यक्षात सर्वाधिक गरजू आणि संघर्षातून शिक्षण घेणारे विद्यार्थीच बाहेर फेकले जात असतील, तर त्या धोरणांचा फेरविचार होणे आवश्यक ठरते. सामाजिक कल्याणाच्या योजनांचे उद्दिष्ट केवळ आकडेवारी सुधारणे नसून, दुर्बल घटकांना समान संधी उपलब्ध करून देणे हे असले पाहिजे. आज राज्यातील हजारो मागासवर्गीय विद्यार्थी आर्थिक विवंचना आणि सामाजिक अडचणींवर मात करून शिक्षण पूर्ण करण्यासाठी झगडत आहेत. त्यांच्यासाठी स्वाधार योजना ही केवळ आर्थिक मदत नाही, तर त्यांच्या स्वप्नांना आणि भविष्याला मिळालेला आधार आहे. त्यामुळे या योजनेतील ३० वर्षांची वयोमर्यादा रद्द करणे किंवा किमान ती शिथिल करणे, ही काळाची गरज बनली आहे. सामाजिक न्यायाचा दावा करणाऱ्या शासनाने विद्यार्थ्यांच्या भावना समजून घेत या निर्णयाचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे.

# पर्यावरणाचा जागर घराघरातून वाढवूया !

पर्यावरण संरक्षण आजच्या काळात का आवश्यक आहे? हा प्रश्न आता केवळ शैक्षणिक चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर मानवी अस्तित्वाशी निगडित वास्तव बनला आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, नैसर्गिक साधनसंपत्तीवरील वाढता ताण, हवामानातील बदल,पाण्याची टंचाई आणि जैवविविधतेसमोरील आव्हाने यामुळे पर्यावरण संरक्षणाची गरज पूर्वीपेक्षा अधिक तीव्रतेने जाणवत आहे. मानव आणि निसर्ग यांचे नाते परस्परावलंबी आहे. निसर्गाचे संतुलन अबाधित राहिले तरच विकासाची वाटचाल शाश्वत होऊ शकते. म्हणूनच दरवर्षी ५ जून रोजी साजरा होणारा जागतिक पर्यावरण दिन हा केवळ एक दिवस नसून पर्यावरण संरक्षणाच्या सामूहिक संकल्पनेचा जागतिक उत्सव आहे.

जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना १९७२ मध्ये स्वीडनमधील स्टॉकहोम येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या 'मानवी पर्यावरण परिषदेत ' मांडण्यात आली. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून घोषित केला आणि १९७३ पासून त्याचे औपचारिक आयोजन सुरू झाले. या उपक्रमामागील उद्देश जगभरातील नागरिक, संस्था आणि शासन व्यवस्थांना पर्यावरणाबाबत जागरूक करणे हा होता. आज हा दिवस १५० हून अधिक देशांमध्ये विविध उपक्रमांद्वारे साजरा केला जातो.

पर्यावरणाच्या महत्त्वाबाबत जगातील अनेक तज्ज्ञांनी वेळोवेळी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. पर्यावरणवादी आणि संयुक्त राष्ट्रांच्या माजी अहवालांमध्ये ' पृथ्वी ही आपल्याला पूर्वजांकडून मिळालेली संपत्ती नसून पुढील पिढीकडून घेतलेले कर्ज आहे ' हा विचार वारंवार अधोरेखित करण्यात आला आहे. सुप्रसिद्ध पर्यावरण अभ्यासक 'लेस्टर ब्राऊन ' यांनी म्हटले आहे की, 'पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यांना वेगळे करता येत नाही; पर्यावरण कोलमडले तर अर्थव्यवस्थाही टिकणार नाही. तर ज्येष्ठ पर्यावरणवादी 'वंगारी मथाई' यांनी वृक्षलागवडीला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. या विचारांतून पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारी जबाबदारी नसून लोकसहभागाची चळवळ असल्याचे स्पष्ट होते.

भारतासमोर पर्यावरणासंदर्भात अनेक संधी आणि आव्हाने आहेत. लोकसंख्या वाढ, शहरी विस्तार, पाण्याचे व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेणे ही महत्त्वाची क्षेत्रे आहेत. महाराष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर जलस्रोतांचे संवर्धन, जंगलांचे संरक्षण, शहरी भागातील हरित क्षेत्र वाढविणे, नदी संवर्धन, मृदा धूप रोखणे, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा या माध्यमातून अक्षय वीज निर्मितीचे लक्ष्य पूर्ण करणे आणि जैवविविधतेचे जतन करणे यांसारख्या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे या क्षेत्रात अनेक सकारात्मक उपक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाकडे केवळ समस्यांच्या दृष्टीने न पाहता, शाश्वत विकासाच्या संधी म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे. विकासकामे आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हे आधुनिक प्रशासनासमोरील मोठे आव्हान आहे. त्यामुळे कोणत्याही मोठ्या प्रकल्पासाठी पर्यावरणीय परवानगी आवश्यक मानली जाते. यामागील उद्देश विकासाला अडथळा निर्माण करणे नसून, त्या प्रकल्पाचा हवा, पाणी, जमीन, वनसंपदा, वन्यजीव आणि स्थानिक समुदायांवर होणारा परिणाम अभ्यासणे हा आहे. पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (एन्व्हायरमेंट इम्पॅक्ट असेसमेंट ) प्रक्रियेमुळे विकासकामे अधिक जबाबदारीने आणि शाश्वत पद्धतीने राबविणे शक्य होते. परिणामी विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात संतुलन राखले जाते.त्यामुळे मोठमोठ्या वसाहती निर्माण करताना पाणवठे निर्माण करणे,त्या बाजूला जैवविविधता निर्माण होईल यासाठी जागरूक असणे आवश्यक आहे,असे छोटे प्रयोग प्रामाणिकपणे निर्माण केल्यास विकास आणि पर्यावरण दोन्ही उद्दिष्टे साध्य करता येतात.




महाराष्ट्र शासनाने पर्यावरण संवर्धनासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत. पर्यावरण व हवामान बदल विभाग यासाठी विशेष प्रयत्न करत आहे.लोकसहभागातील पर्यावरण कृती कार्यक्रम, जनतेच्या सहभागासह पर्यावरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. यापूर्वीचे राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी एकाच वर्षी महत्त्वाकांक्षी '५० कोटी वृक्ष लागवड अभियान ' राबविले होते.दरवर्षी राज्य शासन जून - जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड मोहीम राबविते. सध्या बांधावर बांबू लागवडीची एक मोहीम महाराष्ट्रात यशस्वीपणे राबविली जात आहे.राष्ट्रीय बांबू मिशन अंतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, पर्यावरण संवर्धन करणे,उपजीविका विकासाची संधी देणे आणि बांबू-आधारित उद्योगांना चालना देणे हा बांधावरील बांबू लागवड योजनेचा मुख्य उद्देश आहे.

याशिवाय माझी वसुंधरा अभियान, जलयुक्त शिवार अभियान,राज्य तलाव संवर्धन योजना,शेततळे अभियान,गाळमुक्त धरण गाळयुक्त शेती, नाला रुंदीकरण व खोलीकरण योजना,नदी संवर्धन उपक्रम, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे कार्यक्रम, मँग्रोव्ह संवर्धन प्रकल्प, तसेच ग्रामीण व शहरी भागांमधील विविध हरित उपक्रमांमुळे पर्यावरण संरक्षणाला चालना मिळत आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख योजनांपैकी एक असणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेतून जलस्त्रोतांमध्ये वृद्धी झाल्याचे सिद्ध झाले आहे.या महत्वाकांक्षी योजनेला देशातील अनेक राज्यांनी लागू केले आहे. यातून प्रोत्साहन घेऊन अलीकडेच राज्यात हरित क्षेत्र वाढविण्यासाठी व्यापक वृक्षलागवड आणि वनसंवर्धनाच्या नव्या संकल्पनांनाही प्रोत्साहन दिले जात आहे.राज्याच्या हरित आच्छादनात वाढ करण्यासाठी दीर्घकालीन उद्दिष्टांसह विविध उपक्रम राबविले जात आहेत.

हरित पट्टा वाढविण्यासाठी शासनाबरोबरच विविध सामाजिक संस्था,शैक्षणिक संस्था आणि नागरिकही पुढे येत आहेत. शहरी भागांमध्ये उद्याने, जैवविविधता उद्याने, रस्त्यालगत वृक्षलागवड, नदीकाठ संवर्धन आणि स्थानिक वृक्ष प्रजातींचे संरक्षण यावर भर दिला जात आहे. ग्रामीण भागात सामाजिक वनीकरण, गाव तळी,तलाव खोलीकरण, नाला रुंदीकरण, परिसरातील हरितीकरण आणि सामुदायिक वृक्षलागवड कार्यक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. या उपक्रमांमुळे पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होत आहे.

पर्यावरण संरक्षणाची खरी ताकद मात्र सामान्य नागरिकांमध्ये आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरात लहान-लहान पर्यावरणीय व्यवस्था (इकोसिस्टम) विकसित करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. घराच्या अंगणात, गच्चीवर, शाळा-महाविद्यालय परिसरात किंवा सार्वजनिक जागांमध्ये स्थानिक वृक्ष, फुलझाडे, औषधी वनस्पती लावून जैवविविधतेला प्रोत्साहन देता येते. पावसाचे पाणी साठविणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, पाण्याची बचत करणे आणि स्थानिक जलस्रोतांचे संरक्षण करणे ही देखील पर्यावरण संवर्धनाची प्रभावी साधने आहेत.

'जल, जमीन आणि जंगल ' ही आपल्या जीवनव्यवस्थेची तीन मूलभूत आधारस्तंभ आहेत. त्यांचे संरक्षण करणे ही आजच्या पिढीची नैतिक जबाबदारी आहे. आपण ज्या नैसर्गिक संपत्तीचा लाभ घेत आहोत, ती पुढील पिढीपर्यंत सुरक्षितपणे पोहोचविणे हेच खरे शाश्वत विकासाचे तत्त्व आहे.मान्सूनच्या आगमनानंतर राज्यभर पेरणीच्या कामांना वेग येतो. मान्सूनच्या वेळापत्रकावर शेतकऱ्यांची पेरणी अवलंबून असते.जून महिना हा पावसाळ्याची चाहूल देणारा महिना आहे. वृक्षलागवडीसाठीही हा सर्वोत्तम काळ मानला जातो. प्रत्येक कुटुंबाने आपल्या कुटुंबातील सदस्यसंख्येइतकी झाडे लावण्याचा संकल्प केला, तर पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला मोठी गती मिळू शकते. ज्यांच्याकडे स्वतः ची जागा नाही, त्यांनी शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत परिसर, सार्वजनिक जागा किंवा शासनाच्या वृक्षलागवड मोहिमांमध्ये सहभागी व्हावे.पर्यटनाला जाताना सोबत 'सीडबॉल ' घेऊन जाणे,जंगल परिसरात वृक्ष लागवडीला त्यातून गती देणे सहज शक्य आहे.मात्र केवळ झाडे लावणे पुरेसे नाही; त्यांचे संगोपन आणि संवर्धनही तितकेच महत्त्वाचे आहे.

आज गरज आहे ती निसर्गाला मानवी हस्तक्षेपापासून अभय देण्याची. जलसाठ्यांचे संरक्षण, नदीपात्रांचे जतन, सांडपाणी व्यवस्थापन,जंगलांचे संवर्धन, जैवविविधतेचे रक्षण,अक्षय ऊर्जा निर्मिती आणि नैसर्गिक संसाधनांचा संयमी वापर या माध्यमातून आपण पर्यावरण समृद्ध करू शकतो. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने एक झाड, एक जलस्रोत आणि एक पर्यावरणपूरक सवय यांचे संवर्धन करण्याचा संकल्प केला, तर हरित, समृद्ध आणि शाश्वत भविष्यासाठीचा मार्ग अधिक सुकर होईल.

**प्रवीण टाके**

# हिंदू म्हणून जगायचे असेल तर रामायण-महाभारत चावून चावून आत्मसात केले पाहिजे - संभाजीराव भिडे गुरुजी

**उरण । प्रतिनिधी**

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक शिवतपस्वी आदरणीय परमपूज्य संभाजीराव भिडे गुरुजी यांचे जाहीर व्याख्यान शनिवार, दि. ६ जून २०२६ रोजी जासई येथील लोकनेते दिबा पाटील मंगल कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, उरण रायगड विभागाच्या वतीने या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उरण परिसरातील हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून व्याख्यानाचा लाभ घेतला.

कार्यक्रमस्थळी भिडे गुरुजींचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करून स्वागत करण्यात आले. स्वागतानंतर आपल्या ओजस्वी आणि प्रभावी शैलीत मार्गदर्शन करताना गुरुजी म्हणाले की, हिंदू म्हणून ताठ मानेने जगायचे असेल तर प्रत्येकाला रामायण आणि महाभारत समजले पाहिजे. हे पवित्र ग्रंथ केवळ वाचून चालणार नाहीत, तर त्यांतील विचार आणि आदर्श चावून चावून आत्मसात करून जीवनात उतरवले पाहिजेत. राम, लक्ष्मण, सीता तसेच महाभारतातील पांडव यांच्या आदर्श जीवनातून प्रेरणा घेण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले आणि राष्ट्रनिर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांच्यातील आदर्श पिता-पुत्र नात्याचा उल्लेख करत शिवरायांच्या जडणघडणीत शहाजीराजांच्या संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या अद्वितीय पराक्रम, असीम त्याग आणि स्वाभिमानाचा गौरवपूर्ण उल्लेख करताना गुरुजींनी शंभूराजांचे चरित्र प्रत्येक हिंदू तरुणासाठी प्रेरणा आणि ऊर्जेचा स्रोत असल्याचे सांगितले. हिंदू संस्कृतीचे वैश्विक योगदान स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, जगाला खऱ्या अर्थाने नाती, मूल्ये आणि भाषा हिंदू संस्कृतीने दिली आहेत. भारताचा इतिहास, ऋषिमुनींनी लिहून ठेवलेले पुराणग्रंथ, संतपरंपरेचे विचार आणि सांस्कृतिक वारसा हीच भारताची खरी संपत्ती असल्याचे त्यांनी नमूद केले.




प्रत्येक व्यक्तीने देशाचा इतिहास, ऐतिहासिक स्थळे, प्राणी, वनस्पती आणि पर्यावरण याविषयी ज्ञान मिळवण्यासाठी सातत्याने वाचन केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच आईचे महत्त्व आणि तिचे महात्म्य प्रत्येकाने ओळखले पाहिजे, असे सांगत हिंदू संस्कृतीच्या रक्षणासाठी आणि जनजागृतीसाठी भगवा ध्वज हाती घेऊन स्वातंत्र्य फेरी काढण्याचे आवाहनही त्यांनी उपस्थितांना केले.

आपल्या धारदार शैलीत आणि विविध ऐतिहासिक संदर्भांसह केलेल्या मार्गदर्शनाने भिडे गुरुजींनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमास श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान उरण विभागाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते. गुरुजींच्या विचारांनी प्रेरित होऊन संपूर्ण परिसरात उत्साह आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.




# वृक्षलागवड अभियानातून महाराष्ट्र हरित आणि पर्यावरणदृष्ट्या सक्षम होईल - वनमंत्री गणेश नाईक

**मुंबई । प्रतिनिधी**

अ पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाने त्यात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'एक पेड मां के नाम' या अभियानातून देशभरात वृक्षारोपणाची लोकचळवळ उभी राहिली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील राज्यव्यापी ३०० कोटी वृक्षलागवड अभियानातून महाराष्ट्र हरित आणि पर्यावरणदृष्ट्या अधिक सक्षम होईल, असा विश्वास वनमंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केला.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात केंद्रीय कर्मचारी निवासस्थान संकुलाचे भूमिपूजन आणि पर्यावरण जनजागृतीसाठी तयार करण्यात आलेल्या विशेष प्रचार वाहनाचे उद्घाटन वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. गृह स्वयं पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा आमदार प्रवीण दरेकर, आमदार संजय उपाध्याय, आमदार प्रकाश सुर्वे, आमदार मनीषा चौधरी, प्रभाग समिती अध्यक्ष प्रकाश दरेकर, गणेश शंकर, सरिता झोरे, अंकिता सावे, मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर, मुख्य वनसंरक्षक (सीसीएफ) के. प्रदीपा, एन.आर. प्रवीण, वन विभागाच्या उपसचिव निकिता पांडे तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या संचालिका अनिता पाटील उपस्थित होत्या.

नाईक म्हणाले की, ग्लोबल वॉर्मिंगमुळे पर्यावरण संरक्षणाची गरज सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली आहे. पारंपरिक पेट्रोल आणि डिझेल इंधनांना पर्याय म्हणून सौर आणि पवन ऊर्जे सारख्या पर्यावरणपूरक ऊर्जा स्रोतांवर भर देण्याची आवश्यकता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र वेगाने प्रगती करत असून विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखण्याचे काम शासन करत आहे.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन्यप्राण्यांना जंगलातच खाद्य उपलब्ध व्हावे यासाठी जांभूळ, पेरू, फणस यासारख्या फळझाडांची मोठ्याप्रमाणावर लागवड करण्यात येणार आहे. त्यामुळे वन्यप्राणी अन्नाच्या शोधात जंगलाबाहेर येण्याचे प्रमाण कमी होईल. डोंगरवस्त्या आणि पाड्यांपर्यंत रस्ते सुविधा पोहोचविण्यासोबतच देवराई आणि वनराई निर्माण करण्यास प्राधान्य दिले जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.




मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्या विनंतीनुसार सामाजिक वनीकरण विभागामार्फत मुंबईसाठी एक लाख वृक्षरोपे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. वन कर्मचाऱ्यांना आवश्यक सुविधा व आधुनिक साधने उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू असून वनविभागासाठी रोख्यांच्या माध्यमातून निधी उभारण्याचाही विचार सुरू आहे. राज्यातील पाच विभागांमध्ये टिश्यू कल्चर केंद्रे सुरू झाली असून त्यातून मोठ्या प्रमाणात दर्जेदार रोपनिर्मिती केली जाणार आहे. २०४७ पर्यंत विकसित आणि सामर्थ्यवान भारत घडविण्यासाठी पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक व्यापक करण्याचे आवाहनही वनमंत्री नाईक यांनी केले.

आमदार मनीषा चौधरी यांनी प्रत्येक नागरिकाने आपल्या आईच्या नावाने किमान एक झाड लावून ते जगविण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले. 'प्लास्टिक हटाव, पर्यावरण बचाव' हा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

आमदार प्रकाश सुर्वे म्हणाले की, वाढत्या उष्णतेच्या लाटांमुळे पाण्याची गंभीर समस्या निर्माण होत आहे. वृक्षारोपण हा त्यावरील प्रभावी उपाय असून वृक्षांमुळे पाऊस वाढतो आणि पाणी संवर्धनास मदत होते. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या ३०० कोटी वृक्षलागवड अभियानाला नागरिकांनी कृतीशील प्रतिसाद द्यावा. आमदार संजय उपाध्याय यांनी निसर्गाचा अमूल्य ठेवा पुढील पिढ्यांपर्यंत सुरक्षित पोहोचविण्यासाठी वृक्षारोपणासोबतच इंधन बचतीकडे लक्ष देण्याचे आवाहन केले. वाहनांचा वापर कमी करून सायकलचा वापर वाढविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. आमदार प्रवीण दरेकर यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली वनविभागात सकारात्मक बदल घडत असल्याचे सांगितले. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात भव्य प्रवेशद्वार आणि आधुनिक ग्रंथालय उभारण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. जितेंद्र रामगावकर यांनी राज्यातील ३०० कोटी वृक्षलागवड मोहिमेद्वारे महाराष्ट्रातील वनक्षेत्र ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट असल्याचे सांगितले. तर के. प्रदीपा यांनी राज्यातील टिश्यू कल्चर केंद्रांमधून दीड कोटी रोपांची निर्मिती करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आल्याची माहिती दिली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या संचालिका अनिता पाटील यांनी मुंबईच्या मध्यवर्ती भागात असलेले हे उद्यान शहराचे 'फुफ्फुस' असल्याचे सांगितले. उद्यानाला पर्यटन आणि पर्यावरण शिक्षणाचे केंद्र बनविण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविण्यात येत असून ३४ हेक्टर क्षेत्रावर मियावाकी पद्धतीचे जंगल विकसित करण्यात येणार आहे. उद्यानात जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण केल्या जात असून पर्यटकांची संख्या सातत्याने वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमात वन कर्मचाऱ्यांना जंगलात स्वसंरक्षणासाठी उपयुक्त असलेल्या किटचे वाटप प्रातिनिधिक स्वरूपात करण्यात आले.

## थोडक्यात

### ४१ ग्रामपंचायतच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

**परभणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मानवत तालुक्यातील डिसेंबर २०२६ अखेर मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीतील आरक्षण कार्यक्रम जाहीर करून आरक्षण काढण्यासाठी ४१ ग्रामपंचायतच्या प्राधिकृत अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी ग्राम महसूल अधिकारी यांची तहसील कार्यालयामध्ये बैठक घेऊन त्यांना ग्रामपंचायत आरक्षण या बाबतीत सखोल मार्गदर्शन करून योग्य त्या सूचना केल्या. यावेळी ग्रामपंचायतच्या एकूण सदस्य संख्येच्या ५०%

आरक्षण, नामाप्र चे २७ टक्के आरक्षण, एससी एसटी व महिला आरक्षण काढण्यासंदर्भात शासकीय नियमाचे योग्य ते मार्गदर्शन केले. कोणत्याही ग्रामपंचायत मध्ये ५०% पेक्षा जास्त आरक्षण एससी एसटी नामाप्र च्या आरक्षणासह जाणार नाही याबाबत सर्व आदेशित कर्मचारी यांनी विशेष लक्ष देण्याचे सुचित केले. यावेळी राज्य निवडणूक आयोगाकडून आलेले वेळापत्रकही सांगितले.

आरक्षणाची सोडत काढण्याकरिता विशेष ग्रामसभेचे सूचना देणे ८ जून विशेष ग्रामसभा बोलून आरक्षण सोडत काढणे १२ जुन प्रभाग निहाय आरक्षण प्रारूप अधिसूचनेला जिल्हाधिकारी यांनी मान्यता देणे १७ जुन प्रभाग निहाय आरक्षणाचे प्रारूप प्रसिद्ध करणे

उपविभागीय अधिकारी यांनी प्राप्त हरकती विचारात घेऊन अभिप्राय देणे ३ जुलै अंतिम अधिसूचनेस जिल्हाधिकारी यांनी मान्यता देणे ८ जुलै व अंतिम प्रभाग रचनेला नमुना व्यापक प्रसिद्धी देणे १० जुलै ४१ ग्रामपंचायतीचे आरक्षण काढण्यासाठी एकूण १४ प्राधिकृत अधिकारी त्यासोबतच संबंधित ग्रामपंचायतचे ग्राम पंचायत अधिकारी ग्राम महसूल अधिकारी यांच्या नियुक्तीचे आदेश तहसील कार्यालयाकडून काढण्यात आले. तालुक्यामध्ये दिनांक ९, १०, ११ जुन रोजी विशेष ग्रामसभा घेण्याकरिता वेळापत्रक तयार केले आहे. सदरील कामामध्ये कोणीही टाळाटाळ करणार नाही याचे काळजी सर्व संबंधितानी घेण्याच्या सुचना तहसीलदार मानवत यांनी केल्या. यावेळी निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार संजय खिल्लारे, संतोष वायकोस,बापू रासवे, संगणक ऑपरेटर राहुल खाडे हजर होते. प्राधिकृत अधिकारी म्हणून सर्व मंडळ अधिकारी पंचायत समिती मधिल विस्तार धिकारी, कृषी विभागाचे अधिकारी इत्यादीच्या नियुक्ती केल्या.

### तालुका कृषी विभागाकडून खतांचे आगाऊ बुकिंग बाबत जनजागृती करिता तालुक्यात बैठका

**सोयगाव । प्रतिनिधी**

खरीप हंगामात शेतकऱ्यांना खतांचा वेळेवर व सुरळीत पुरवठा व्हावा यासाठी तालुका कृषी विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या खतांचे आगाऊ बुकिंग उपक्रमाच्या जनजागृतीसाठी दि.०५ शुक्रवार पासून तालुक्यात शेतकरी बैठक आयोजित करण्यात आल्या आहेत. तालुक्यातील शेतकऱ्यांना आधार पडताळणी, पीक व खत निवड, खत विक्रेता निवड तसेच ठट कोड/टोकनच्या माध्यमातून खत प्राप्त करण्याची संपूर्ण प्रक्रिया सविस्तर समजावून सांगण्यात आली. तसेच आगाऊ बुकिंग केल्यास खतांची उपलब्धता निश्चित होऊन गर्दी व गैरसोय टाळता येते, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले यावेळी शेतकऱ्यांना मोबाईलद्वारे नोंदणी व आगाऊ बुकिंग कसे करावे याचे प्रात्यक्षिकही दाखविण्यात आले. उपस्थित शेतकऱ्यांनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.शुक्रवार पासून तालुक्यातील गावागावात कृषी विभागाच्या पथकाने शेतकऱ्यांना याबाबत मार्गदर्शन केले दरम्यान पहिल्याच दिवशी तालुक्यात केवळ १०० शेतकऱ्यांचे हे प्रात्यक्षिक यशस्वी झाले असून पहिल्याच ऍप्स मध्ये तांत्रिक अडचणींना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागले होते दरम्यान शुक्रवारी ऍप्स मध्ये यशस्वी झालेल्या शंभर शेतकऱ्यांना शनिवारी तालुक्यातील विविध ठिकाणी खते मिळणार आहे कृषी विभागाच्या या उपक्रमास शेतकऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून आगाऊ खत बुकिंग प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन तालुका कृषी अधिकारी भारत कासार यांनी यावेळी केले.

# घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महापालिकेची विशेष कार्यशाळा

**पिंपरी । प्रतिनिधी**

केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे शुक्रवारी ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यशाळेस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांच्यासह अन्य महापालिका अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने अधिसूचना क्र. एस.ओ. ३८८ (अ) द्वारे घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ जाहीर केले असून १ एप्रिल २०२६ पासून त्यांची अंमलबजावणी सुरू झाली आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयानेही घनकचरा व्यवस्थापन नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना नव्या नियमांची माहिती देण्यासाठी आणि प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मार्गदर्शन करताना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले की, घनकचऱ्याचे स्रोतस्तरावर वर्गीकरण, शास्त्रोक्त प्रक्रिया आणि वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावणे ही काळाची गरज आहे. स्वच्छ, हरित आणि शाश्वत शहर उभारण्यासाठी प्लास्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार मोठ्या आस्थापनांना नियमांच्या पालनासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात येणार असून शहर विद्रूप करणाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

पुढे बोलताना त्यांनी प्रत्येक नागरिकाने शहराला स्वतःचे घर समजून स्वच्छतेसाठी महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन केले. तसेच गृहनिर्माण संस्थांमध्ये कचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. लोकसहभागातूनच स्वच्छ आणि सुंदर शहर घडू शकते, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी फूटपाथ, रस्ते आणि अतिक्रमणांवरील कारवाई यापुढेही सुरू राहणार असल्याचे स्पष्ट केले. भविष्यात पिंपरी चिंचवड शहर देशातील स्वच्छ आणि आदर्श शहरांमध्ये




अग्रस्थानी असेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी आयुक्तांच्या हस्ते 'माझी वसुंधरा ५.०' अभियानात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या उद्यान, पर्यावरण आणि आरोग्य विभागातील गुणवंत कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी नवीन नियमांमुळे घनकचरा व्यवस्थापन अधिक शिस्तबद्ध, परिणामकारक आणि उत्तरदायी होणार असल्याचे सांगितले. नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विभागीय समन्वय, नियमित निरीक्षण आणि नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी केले. त्यांनी घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ मधील विविध तरतुदींची सविस्तर माहिती देत कचऱ्याचे वर्गीकरण, संकलन, वाहतूक, प्रक्रिया आणि विल्हेवाट यासंदर्भातील जबाबदाऱ्या स्पष्ट केल्या. तसेच नियमांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी व्यापक जनजागृतीला प्राधान्य देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यशाळेस मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता मनोज सेठिया, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, उप आयुक्त अण्णा बोदडे, डॉ. प्रदीप ठेंगल, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट, सोहम निकम, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक आरोग्य अधिकारी श्रीराम गायकवाड, राजू साबळे, सुधीर वाघमारे, योगेश फल्ले, शांताराम माने, राजेश भाट, अतुल सोनवणे, महेश आढाव, अंकुश झिटे यांच्यासह मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक आणि आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

## लस्सी पिण्यासाठी निघालेल्या चौघांचा काळाने घेतला घाला; भीषण अपघातात जागीच मृत्यू

**बळगाव । प्रतिनिधी**

दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या एकाच कुटुंबातील चौघांवर काळाचा घाला आल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. लस्सी पिण्यासाठी एका दुचाकीवरून जाणाऱ्या चौघा जणांचा भरधाव वाहनाने जबर धडक दिल्याने जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना जळगाव जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यात घडली आहे. या दुर्दैवी अपघातात एका महिला आणि तिच्या अवघ्या एक वर्षाच्या मुलासह चार जणांचा मृत्यू झाला आहे.




या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार मलकापूर येथील रहिवासी असलेले फासे पारधी जमातीचे काही लोक वरणगाव परिसरात कपीलनगरात पत्र्याचे घर बांधून गेल्या २-३ महिन्यांपासून राहत होते. विजय शंकर काळे ( वय १९ ) हा त्याची मामी ऐश्वर्या बहादूर भोसले ( वय ३० ) आणि दोन लहान मुले विश्लेश शंकर चव्हाण ( वय १४ ) आणि मोनालिसा शिवबसप्पा भोसले ( वय १ ) असे चौघे जण दुपारी दुचाकीने लस्सी पिण्यासाठी वरणगाव येथे जात होते. गावाच्या पुढे एका भरधाव वाहनाने त्यांच्या मोटरसायकली जोरदार धडक दिल्यानंतर हे चौघे गंभीर जखमी झाल्याने त्यांना रुग्णालयात नेण्यात आले, तेथे डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

या परिसरातील काही लोकांनी दुचाकीला ओळखून त्यांच्या गावात माहिती दिली. त्यानंतर माहिती मिळताच नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेत सर्वांना जळगाव जिल्हा रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले. त्यानंतर डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

## विनयभंग प्रकरणात राष्ट्रवादीच्या नगरसेवकावर गुन्हा दाखल

**बारामती । प्रतिनिधी**

बारामतीतील राष्ट्रवादीचा विद्यमान नगरसेवक किशोर मासाळ यांच्या संदर्भात एक महत्वाची माहिती समोर आली आहे. नगरसेवक किशोर मासाळ यांच्यावर पक्ष नेतृत्वाने कारवाई करत राजीनामा मागितल्याची माहिती आहे. किशोर मासाळ यांच्यावर गुन्हा नोंद झाल्यानंतर पक्षाकडून हि कारवाई करण्यात आली आहे. एका महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी हा गुन्हा नोंद करण्यात आलाय. तसेच अजित पवार गेल्याने काय फरक पडला नाही, तू गेल्याने काय फरक पडणार आहे? अशी ऑडिओ क्लिप व्हायरल झाली होती. या ऑडिओ क्लिपमुळे बारामतीत संतापाची लाट उसळली आहे. अशातच आता किशोर मासाळ काय करतात हे पाहणं महत्वाचं असून या आधी किशोर मासाळ यांनी फेसबुक पोस्ट करून दिलगिरी व्यक्त केली आहे. मात्र पक्षाने त्यांना राजीनामा मागितल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

बारामतीतील राष्ट्रवादीचा विद्यमान नगरसेवक किशोर मासाळ याच्या




विरोधात विनयभंग केल्याचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. बारामती तालुका पोलीस ठाण्यात एका ४५ वर्षीय महिलेच्या फिर्यादीवरून किशोर आप्पासाहेब मासाळ यांच्याविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ फेब्रुवारी २०२६ ते २५ मे २०२६ या कालावधीत आरोपीने फिर्यादी महिलेशी असलेल्या ओळखीचा गैरफायदा घेत तिच्या राहत्या घरी अनधिकृत प्रवेश केल्याचा आरोप आहे. तसेच वेळोवेळी अश्लील स्वरूपाच्या मागण्या करून तिचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

फिर्यादी महिलेने दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने स्वतःच्या ओळखी व प्रभावाचा धाक दाखवत धमक्या दिल्या. तसेच तिचे फोटो सोशल मीडियावर प्रसारित करून बदनामी करण्याची धमकी देत आर्थिक लाभ मिळवून देण्याची मागणी केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, आरोपीने महिलेचा पाठलाग करून तिला मारहाण केल्याचाही आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकरणी बारामती तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २५३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (इछद) कलम ३३२(ल), ७४, ७५, ७८, ११५(२), ३५२ आणि ३५१(२)(३) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## क्लस्टर योजनेला गती देण्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

ठाणे शहरातील धोकादायक इमारतींमधील नागरिकांना तत्काळ दिलासा मिळावा यासाठी क्लस्टर योजनेला गती देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. कोपरी, किसननगर आणि वागळे इस्टेटमधील क्लस्टर योजना जलदगतीने पूर्ण व्हावी यासाठी ही योजना महाप्रीतकडून एमएसआरडीसीकडे हस्तांतरित करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. ठाणे एमआयडीसीची ६०.७२ हेक्टर जमीन क्लस्टर पुनर्वसन प्रकल्पासाठी लवकर हस्तांतरित करण्याचे निर्देश देतानाच ठाणे जिल्ह्यातील क्लस्टर प्रकल्पांना गती देण्यासाठी त्यांना 'व्हायटल पब्लिक हाऊसिंग प्रोजेक्ट' घोषित करणार असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्र्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे ठाणे समूह विकास प्रकल्प आणि एमआयडीसीबाबत आढावा घेतला. ठाणे समूह विकास प्रकल्प आता 'महाप्रीत' ऐवजी एमएसआरडीसीकडून करण्यात येणार असल्याचे सांगत या बदलासाठी आवश्यक असणारी हस्तांतरणाची कायदेशीर प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. यावेळी उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नवीन सोना, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासु आणि संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.



ठाणे समूह विकास प्रकल्प हा देशातील पहिला भव्य समूह विकास प्रकल्प असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, ठाणे शहराचा हा समूह विकास प्रकल्प नागरिकांना सुरक्षित आणि हक्काची घरे मिळवून देणारा ठरेल. हा केवळ एक गृहनिर्माण प्रकल्प नसून, नागरिकांचे जीवनमान उंचावणारा समूह विकास प्रकल्प असल्याचे त्यांनी सांगितले.

एमआयडीसी क्षेत्रातील ६०.८५ हेक्टर जमीन क्लस्टर योजनेसाठी देण्यास एमआयडीसीने मंजुरी दिली होती. त्याबदल्यात त्यांना १२.५ टक्के विकसित जमीन परत मिळणार होती. मात्र त्यातील काही भूखंडांचे वाटप झाले असल्याने भूखंडधारकांची मंजुरी घेणे, आदिवासी पुनर्वसनासाठी राखीव ७३ भूखंडाचा प्रश्न निकाली काढणे, स्टॉलधारक आणि इतर प्रभावित घटकांना पुनर्वसनाची जबाबदारी निश्चित करण्यासह अन्य विषय प्रलंबित प्रश्न निकाली निघाल्याने उद्योग विभागाची मंजुरी घेऊन येत्या आठवड्याभरात एमआयडीसी आणि टीएमसी यांच्यात त्रिपक्षीय करार पूर्ण करून ही हस्तांतरण प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उद्योग विभागाला दिले.

ठाणे शहरातील वागळे इस्टेट, नवी मुंबईतील एमआयडीसी परिसर, कल्याण डोंबिवली क्षेत्रातील एमआयडीसी क्षेत्र आणि वसई विरार एमआयडीसी क्षेत्र या भागांचा पुनर्विकास हा एमआयडीसीच्या माध्यमातून क्लस्टर योजना राबवून करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. मात्र अद्यापही या योजनांना अपेक्षित गती मिळालेली नाही त्यामुळे या क्षेत्रातील धोकादायक इमारतींमध्ये जीव मुठीत धरून राहणाऱ्या लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी या प्रकल्पांना व्हायटल पब्लिक हाऊसिंग प्रोजेक्ट घोषित करून या प्रकल्पांना गती देण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच ठाणे क्लस्टर योजनेप्रमाणे शासनाला १२.०५ टक्के जमीन देऊन या पुनर्वसन प्रकल्पांना गती देण्यात येणार आहे. क्लस्टर पुनर्विकास योजना राबवताना पुनर्वसनासाठी ट्रान्झिट सदनिका उभारण्याला प्राधान्य देण्याची गरज असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या बैठकीत स्पष्ट केले.

## फोटो व्हायरल करण्याची धमकी देत अल्पवयीन मुलीचा विनयभंग; आरोपी अटकेत

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातून महिला आणि मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आणणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका अल्पवयीन मुलीला माझ्याकडे तुझे फोटो आहेत, तू पळून आली नाहीस तर ते सोशल मीडियावर व्हायरल करीन, अशी धमकी देत तिचा विनयभंग करण्यात आला आहे. या त्रासाला कंटाळून पीडितेने अखेर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली. या तक्रारीवरून परळी पोलिसांनी आरोपी कृष्णा बाबूराव शिंदे याला अटक केली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, पीडित अल्पवयीन मुलगी नेहमीप्रमाणे घरातून दूध आणण्यासाठी बाहेर पडली होती. ती रस्त्याने जात असताना आरोपी कृष्णा शिंदे याने तिचा पाठलाग केला. गल्लीत ती एकटी असल्याचे पाहून आरोपीने तिला गाठले आणि तिचा रस्ता अडवून विनयभंग केला. आरोपीने पीडितेचा केवळ विनयभंग केला नाही, तर तिच्यावर मानसिक दबावही टाकला. आपण दोघे पळून जाऊन लग्न करू, तू पळून जाण्यासाठी तयार राहा, असे तो पीडितेला म्हणाला. जेव्हा पीडितेने या गोष्टीला नकार दिला, तेव्हा आरोपीने तिला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. माझ्याकडे तुझे फोटो आहेत, तू जर माझ्यासोबत पळून आली नाहीस तर हे सर्व फोटो मी सोशल मीडियावर व्हायरल करून तुझी बदनामी करीन, अशी थेट धमकीच त्याने दिली.

आरोपी कृष्णा शिंदे याच्या त्रासाला आणि धमक्यांना कंटाळून अखेर पीडित मुलीने आपल्या कुटुंबाला घडलेला प्रकार सांगितले. त्यानंतर तात्काळ परळी पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# बोरिवलीतील हायप्रोफाइल रूफटॉप बारवर उत्पादन शुल्क विभागाची धाड; लाखोंचा मद्यसाठा जप्त

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतील बोरिवली भागात बेकायदेशीर आणि अवैध रित्या सुरू असलेल्या एका हायप्रोफाइल बारवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडक कारवाई करून त्यांचा मुजोरपणा मोडून काढला आहे. बोरिवली (पश्चिम) येथील एक्सर व्हिलेज परिसरातील 'मुझा हॉटेल बाय एस. के. रीसॉर्ट'च्या ८ व्या मजल्यावरील 'औरीस द स्काय लॉज'च्या गच्चीवर (रूफटॉप) राज्य उत्पादन शुल्क विभागाने ही यशस्वी धाड टाकली.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथक क्र. १ (मुंबई उपनगर) यांनी १ जून रोजी मध्यरात्रीच्या सुमारास ही अत्यंत गोपनीय आणि मोठी कारवाई केली. या कारवाईदरम्यान पथकाने लाखो रुपयांचा अवैध मद्यसाठा जप्त केला असून घटनास्थळावरून तिघांना अटक करण्यात आली आहे. या धडक कारवाईत जप्त करण्यात आलेल्या मद्यसाठ्याचा आणि मालाचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे समोर आला आहे:

३२६ दारूच्या बाटल्या जप्त : कारवाई दरम्यान वेगवेगळ्या ब्रँड्सच्या एकूण ३२६ दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत. यामध्ये विदेशी स्कॉच व्हिस्की, परदेशी वाईन, भारतीय बनावटीचे विदेशी मद्य (खचडकऌ), बिअर आणि विझरच्या साठ्याचा समावेश आहे. अंदाजे दीड लाखांचा मुद्देमाल : जप्त करण्यात आलेल्या या संपूर्ण अवैध मद्यसाठ्याची एकूण बाजारपेठ किंमत १ लाख ५८ हजार ८७५ रुपये इतकी असल्याची माहिती समोर आली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिलेल्या माहितीनुसार, या बेकायदेशीर बारमधून कुणाल हितेंद्र विचारे (वय ३२), स्वप्नील रवि पगार (वय २९) आणि विजय प्रकाश वंजारा (वय ३०) या तिघांना अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेले हे बार मालक गुन्हेगारी प्रवृत्तीचे असून, त्यांच्यावर याआधी देखील विविध गुन्हे दाखल झाले असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.



आरोपींकडे या मोठ्या मद्यसाठ्याबाबत कोणताही वैध परवाना, पास किंवा अधिकृत खरेदीची कागदपत्रे आढळून आली नाहीत. हा मद्यसाठा विनापरवाना बेकायदेशीररीत्या केवळ ग्राहकांना विक्री करण्यासाठीच गच्चीवर ठेवण्यात आल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

विशेष म्हणजे, मागच्या महिन्यात देखील याच बारवर मुंबई महानगरपालिकेने (इचद) तोडक कारवाई केली होती. मात्र, तरीही मुजोर आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या मालकांनी कायद्याची कोणतीही भीती न बाळगता हा बार पुन्हा बेधडकपणे सुरूच ठेवला होता. अखेर उत्पादन शुल्क विभागाने कारवाई करत त्यांचा माज उतरवला आहे.

या प्रकरणी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे जवान पी. व्ही. गवळी यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्व आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ अंतर्गत कलम ६५ (ई), ८१ आणि ८३ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, या संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक एस. जी. देवरे करत आहेत.

## संक्षिप्त

### कर्जमाफीच्या जाचक अटींविरोधात सातोना येथे शेतकऱ्यांचे निषेध आंदोलन

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने नुकतीच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना मंजूर करून दोन लाख रुपयांपर्यंतचे शेतकरी कर्ज माफ करण्याची घोषणा केली आहे. मात्र, या कर्जमाफीसाठी घालण्यात आलेल्या अटी व नियमांमुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम व नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. शासनाने जाचक अटी लागू करून हजारो शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे.

याच पार्श्वभूमीवर परतूर तालुक्यातील सातोना येथे शेतकऱ्यांनी एकत्र येत शासनाच्या धोरणाविरोधात निषेध आंदोलन केले. आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांनी शासना निर्णयाविरोधात घोषणाबाजी करत आपल्या भावना व्यक्त केल्या. सरकारने सातबारा कोरा करण्याचे आश्वासन देऊन शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. ही कर्जमाफी म्हणजे शेतकऱ्यांची थट्टा असून, जाचक अटी व नियम लावून शासनाने अनेक पात्र शेतकऱ्यांना अपात्र ठरवले आहे. त्यामुळे अशा फसव्या कर्जमाफीऐवजी सरसकट कर्जमाफी जाहीर करावी.

या आंदोलनात सातोना व परिसरातील मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी सहभाग घेत शासनाच्या धोरणाविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली. शासनाने कर्जमाफीतील जाचक अटी व नियम तात्काळ रद्द करून सर्व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचा द्यावी, अशी मागणी आंदोलक शेतकऱ्यांनी केली.

### वार्षिक अहवाल सादर करण्याचे निर्देश -उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय संचालनालयाने राज्यातील सर्व शासनमान्य सार्वजनिक व ग्रामपंचायत ग्रंथालयांना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे वार्षिक अहवाल लायब्ररी ग्रँट मॅनेजमेंट सिस्टिम (एलजीएमएस) या ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर करण्याचे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी दिले आहेत.

मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील म्हणाले, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या १४ जुलै २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार सार्वजनिक ग्रंथालयांना वार्षिक अहवाल तसेच लेखापरीक्षण अहवाल एलजीएमएस प्रणालीवर अपलोड करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यानुसार चालू वर्षासाठी अहवाल सादर करण्याची प्रक्रिया ३० जून २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. राज्यातील सर्व सहाय्यक ग्रंथालय संचालक, जिल्हा ग्रंथालय अधिकारी तसेच शासनमान्य सार्वजनिक व ग्रामपंचायत ग्रंथालयांना या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले. जिल्हा ग्रंथालय अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील ग्रंथालयांना आवश्यक मार्गदर्शन करून वार्षिक अहवाल अचूक व वेळेत सादर होतील यासाठी विशेष दक्षता घ्यावी, असे मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी सांगितले.

तसेच, विहित मुदतीत अहवाल सादर न करणाऱ्या किंवा अपूर्ण अथवा चुकीची माहिती सादर करणाऱ्या ग्रंथालयांना अनुदान मंजूर करण्यात येणार नसल्याचा इशाराही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिला आहे. त्यामुळे सर्व संबंधित ग्रंथालयांनी वेळेत माहिती भरून प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

एलजीएमएस प्रणालीवर माहिती भरताना तांत्रिक अडचणी आल्यास संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. राज्यातील ग्रंथालय व्यवस्थापन अधिक पारदर्शक व डिजिटल करण्याच्या दृष्टीने शासनाने हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यावर भर दिला आहे.

# वन विभागाची धडक कारवाई; अवैध वृक्षतोड प्रकरणी २.२०८ घनमीटर लाकूड जप्त

## गांधीनगरात वन विभागाची धडक कारवाई; विनापरवाना तोडलेले १२ लाकडी ओंडके जप्त

**जालना । प्रतिनिधी**

आज दिनांक ६ शनिवार रोजी सकाळी दहा वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना, जागतिक पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर वन विभागाने अवैध वृक्षतोडीविरोधात मोठी कारवाई करत जालना शहरातील गांधीनगर परिसरातून मोठ्या प्रमाणात विनापरवाना तोड करण्यात आलेले लाकूड जप्त केले. या कारवाईमुळे अवैध वृक्षतोड करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. काल दिनांक ५ शुक्रवार रोजी

प्राप्त झालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे वन विभागाच्या पथकाने गांधीनगर येथील एका ठिकाणी छापा टाकला. तपासादरम्यान जॉनसन यशवंत पाखरे यांच्या मालकीच्या जागेवर लिंब प्रजातीचे १२ नग गोल इमारती लाकूड (एकूण २.२०८ घनमीटर) विनापरवाना तोड करून साठवून ठेवलेले आढळून आले. वन विभागाने तत्काळ हा संपूर्ण साठा जप्त करून संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू केली




आहे.

या प्रकरणी भारतीय वन अधिनियम, १९२७ तसेच महाराष्ट्र वृक्षतोड (नियमन) अधिनियम, १९६४ अंतर्गत वन गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई उपवनसंरक्षक सौ. सुवर्णा माने यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहायक वनसंरक्षक सुदाम मुंढे यांच्या नियंत्रणाखाली पार पडली. वनपरीक्षेत्र अधिकारी सौ. नीता फुले यांच्या नेतृत्वाखाली वनपरिमंडळ अधिकारी अनिल जाधव, वनरक्षक वायाळ, सोडगीर, घुगे आणि इतर कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे ही मोहीम यशस्वी केली.

वन विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, आपल्या परिसरात कुठेही अवैध वृक्षतोड, लाकडाची बेकायदेशीर वाहतूक किंवा साठवणूक होत असल्याचे आढळल्यास तात्काळ वन विभागाला माहिती द्यावी. पर्यावरण संरक्षणासाठी नागरिकांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

झाडे वाचवा, पर्यावरण जपा या संदेशासह वन विभागाने अवैध वृक्षतोडीविरोधातील कारवाया आणखी तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

# सरपंचांना प्रशासकपदाचा मान; मात्र निधी खर्चावरील निर्बंधामुळे वाढला ताण

**हदगाव । प्रतिनिधी**

सरपंचांना प्रशासक म्हणून नियुक्ती देण्यात आली असली, तरी विविध विकासकामांसाठी निधी खर्च करण्यावरील निर्बंधांमुळे सरपंच प्रशासकांची मोठी कोंडी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. पंधरावा वित्त आयोग, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) तसेच इतर विकास निधी खर्च करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी हदगाव तालुका सरपंच संघटनेने मुख्यमंत्री यांच्याकडे गटविकास अधिकारी यांच्या मार्फत निवेदनाद्वारे केली आहे.

फेब्रुवारी २०२६ पासून राज्य शासनाने सरपंचांना प्रशासक म्हणून नियुक्त केले. मात्र, सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित प्रकरणामुळे विविध निधींच्या खर्चावर निर्बंध आले आहेत. परिणामी गावांतील विकासकामे रखडली असून पाणीटंचाईसारख्या



गंभीर समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्यास अडचणी निर्माण होत आहेत.

उन्हाळ्यात अनेक गावांमध्ये पाणीटंचाईची समस्या तीव्र झाली आहे. मात्र निधी खर्च करण्याचे अधिकार नसल्याने सरपंच प्रशासकांना नागरिकांच्या प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. गेल्या तीन महिन्यांपासून ही परिस्थिती कायम असून सर्वोच्च न्यायालयात वारंवार सुनावण्या होत असल्या तरी अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. या प्रकरणाची पुढील सुनावणी २२ जून रोजी होणार असल्याची माहिती सरपंच प्रशासकांकडून देण्यात आली. या सुनावणीत सरपंच प्रशासकांना निधी खर्चाचे अधिकार दिले जातील, राज्य शासनाला ग्रामपंचायत निवडणुका घेण्याचे निर्देश दिले जातील किंवा अन्य कोणता मार्ग काढला जाईल, याकडे राज्यातील सर्व सरपंच प्रशासकांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, ग्रामविकास विभागाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन विकासकामे पूर्ववत सुरू होण्यासाठी आवश्यक निर्णय घ्यावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी हदगाव तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष अमोल पाटील (सरपंच, रुई धा.), उपाध्यक्ष शीतल गजानन कंठाळे (सरपंच, येवली), सचिव खंडू ठोके (सरपंच, वाळकी), सरपंच प्रतिनिधी कैलास तलवारे (कोथळा), अमरदीप दवणे (गुरफळी), मल्हारी सोळंके (हस्तरा) यांच्यासह अनेक सरपंच प्रशासक उपस्थित होते.

# अंबडचे तहसीलदार ए.सी.बी च्या जाळ्यात ६ लाख ४० हजारांची लाच घेताना विजय चव्हाण रंगेहात पकडले

## वाळू माफियांकडून महिन्याला ७ लाखांच्या हप्त्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

अंबड तालुक्याचे तहसीलदार विजय चव्हाण यांना बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ( ए.सी.बी ) ६ लाख ४० हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडल्याने महसूल विभागात एकच खळबळ उडाली आहे. अवैध वाळू उपशावर कारवाई न करण्यासाठी आणि सहा हायवा वाहने सुरू ठेवण्यासाठी त्यांनी तब्बल ७ लाख रुपयांच्या मासिक हप्त्याची मागणी केल्याचा आरोप आहे. तक्रारदाराने ए.सी.बी कडे धाव घेतल्यानंतर सापळा रचण्यात



आला. पडताळणीत लाचेची मागणी निष्पन्न झाल्यानंतर ६ लाख ४० हजार रुपये स्वीकारताना तहसीलदार विजय चव्हाण यांना ए.सी.बी च्या पथकाने रंगेहात पकडले.

वाळू माफियांवर धडक कारवाया करून स्वतःची प्रतिमा कठोर अधिकारी म्हणून निर्माण करणारे तहसीलदारच लाचखोरीच्या आरोपात अडकले आहेत. कारवाईच्या नावाखाली सुरू असलेला हप्तेखोरीचा खेळ अखेर उघड झाल्याची चर्चा जिल्हाभर सुरू आहे.


**महसूल विभाग हादरला**

बीड ए.सी.बी चे उपअधीक्षक सोपान चिटमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणामुळे महसूल विभागातील कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून पुढील चौकशीत आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# राज्यात किमान १५ जूनपर्यंत सर्वत्र मान्सूनच्या पावसाची शक्यता कमी

**मुंबई । प्रतिनिधी**

मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांतील काही भागांमध्ये ९ जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र, त्यानंतर किमान १५ जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर तसेच मान्सूनच्या प्रगतीचा वेग कमी होण्याची शक्यता हवामानाच्या सध्याच्या अंदाजातून दिसून येत आहे. त्यामुळे या कालावधीत राज्यात सर्वत्र समाधानकारक पावसाची शक्यता कमी आहे.





सध्याच्या हवामान अंदाजानुसार किमान १५ जूनपर्यंत विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये दुपारनंतर ढग आणि विखुरलेल्या स्वरूपाचा मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तथापि, हा पाऊस व्यापक क्षेत्रात पेरणीस पोषक ठरेल, अशी परिस्थिती अद्याप दिसत नाही.

दरम्यान, किमान १२ जूनपर्यंत राज्यातील अनेक भागांमध्ये कमाल तापमान सध्याप्रमाणेच उच्च राहण्याची शक्यता आहे. विदर्भ व खानदेशात कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक, तर मराठवाड्यात ३५ ते ४० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याचा अंदाज आहे.

# उन्मळून पडलेल्या झाडांच्या पुनर्रोपणासह नवीन वृक्षारोपण उपक्रम राबवा - उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती शहर आणि परिसरात शुक्रवारच्या वादळी पावसामुळे शहरातील उन्मळून पडलेल्या झाडांचे मुळासकट पुनर्रोपण करावे, पावसाळ्यापूर्वी नव्याने अधिकाधिक वृक्षारोपण करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. तत्पूर्वी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त एन्व्हॉर्यमेंटल फोरम ऑफ इंडिया, बारामती सायकल क्लब आणि बारामती हेल्थ क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तिरंगा सर्कल ते पुनावाला गार्डन रेल्वे स्टेशन मार्ग दरम्यान सायकल रॅलीला उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांच्या हस्ते झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला.



उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी शहरातील वादळग्रस्त भागाची पाहणी केली. यावेळी बारामतीचे नगराध्यक्ष सचिन सातव, उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे, बारामती 'एमआयडीसी'चे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, गट विकास अधिकारी किशोर माने, न.प. मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी तसेच पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक संभाजी होळकर, स्थानिक लोकप्रतिनिधी, एन्व्हॉर्यमेंटल फोरम ऑफ इंडिया, बारामती सायकल क्लब आणि बारामती हेल्थ क्लबचे पदाधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, बारामती शहर आणि परिसरात शुक्रवारी झालेल्या वादळी पावसामुळे शहरातील नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले होते, यावेळी नागरिकांच्या पुढाकाराने तसेच सर्व यंत्रणांनी अहोरात्र काम करुन जनजीवन पूर्ववत केले. या कालावधीत शहरातील अनेक झाडे उन्मळून पडली, त्यांचे पुनर्रोपण करावे. येत्या पावसाळ्यात अधिक वेगाने वाऱ्याचे वहन झाल्यास झाडे वाचली पाहिजेत, याकरिता उपाययोजना कराव्यात.

# लंडनमध्ये चौथ्यांदा संभाजी महाराज जयंती; दुसऱ्यांदा शिवराज्याभिषेक सोहळ्याचा भव्य जल्लोष

**जालना । प्रतिनिधी**

आज दिनांक ६ शनिवार रोजी दुपारी चार वाजता मिळालेल्या माहितीनुसार लंडन, छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या अद्वितीय कार्याचा गौरव करण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज यूथ असोसिएशन, यूके'च्या वतीने लंडनमध्ये चौथ्यांदा भव्य सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. भारतीय इतिहास, संस्कृती आणि स्वाभिमानाचे दर्शन घडविणाऱ्या या कार्यक्रमाने लंडनमधील भारतीय समाजबांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले.

लंडनमधील र्ठेलश्रशढीशश लू क्ळश्रोंप, चरीलश्रश -ीलह येथे आयोजित या कार्यक्रमास विविध क्षेत्रांत कार्यरत भारतीय व्यावसायिक, विद्यार्थी, उद्योजक आणि कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती संभाजी महाराजांच्या मूर्तीचा दुग्धाभिषेक आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेवर पुष्पाभिषेक करून करण्यात आली. त्यानंतर आरती, अभिवादन आणि शिवस्वराज्याच्या इतिहासाला उजाळा देणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.

यावेळी Marble Arch परिसरात काढण्यात आलेल्या भव्य रॅलीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. पारंपरिक मराठमोळी वेशभूषा, भगवे ध्वज आणि 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. या रॅलीमुळे स्थानिक नागरिकांनाही भारतीय संस्कृती आणि महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाची ओळख झाली.

कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरला दुसऱ्यांदा आयोजित करण्यात आलेला 'शिवराज्याभिषेक सोहळा'. पारंपरिक पद्धतीने सादर करण्यात आलेल्या या ऐतिहासिक सोहळ्याने उपस्थितांना शिवकालीन इतिहासाची अनुभूती दिली. स्वराज्य स्थापनेच्या प्रेरणादायी इतिहासाचे दर्शन घडवत या सोहळ्याने उपस्थितांमध्ये अभिमान आणि प्रेरणेची भावना जागृत केली.

या प्रसंगी संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष धिरजसिंह रविंद्र तौर यांनी सांगितले की, परदेशात राहणाऱ्या भारतीयांना त्यांच्या संस्कृतीशी जोडून ठेवणे, नव्याने येणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि व्यावसायिकांना एक



सक्षम व्यासपीठ उपलब्ध करून देणे तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रेरणादायी विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे हा आमच्या संघटनेचा मुख्य उद्देश आहे.

संघटनेच्या उपक्रमांमध्ये त्यांच्या पत्नी प्रणल धिरजसिंह तौर यांचाही सक्रिय सहभाग असून कार्यक्रमाच्या नियोजन आणि समन्वयात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच सुनील पाटील, स्वराज मोहिते, आशुतोष ढमाले, स्वप्निल गावडे आणि कौस्तुभ रामेकर यांच्या अथक परिश्रमामुळे हा कार्यक्रम भव्य, यशस्वी आणि संस्मरणीय ठरला.

धिरजसिंह तौर यांनी पुढे सांगितले की, लंडनमध्ये सलग चौथ्या वर्षी हा कार्यक्रम आयोजित करताना आम्हाला अभिमान वाटतो. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचा इतिहास, त्यांचे विचार आणि स्वाभिमानाची प्रेरणा जगभरातील भारतीयांपर्यंत पोहोचवण्याचे आमचे कार्य भविष्यातही सुरू राहील. भारतीय संस्कृती आणि एकात्मतेचे हे व्यासपीठ अधिक व्यापक करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

लंडनच्या भूमीवर साजऱ्या झालेल्या या सोहळ्याने केवळ महाराष्ट्रीयन समाजालाच नव्हे, तर संपूर्ण भारतीय समुदायाला आपल्या इतिहासाचा आणि संस्कृतीचा अभिमान पुन्हा एकदा अनुभवायला लावला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड,
मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**